30-8 (4)

**SNDT Women's University**
1, Nathibai Thackersey Road,
Mumbai 400 020
Phone: +91 22 2203 1879
Fax: +91 22 2201 8226

**श्रीमती ना. दा. ठाकरसी विद्यापीठ**
१, नाथीबाई ठाकरसी मार्ग
मुंबई ४०० ०२०
Telegram : UNIWOMEN
Website : sndt.ac.in

आस्था/जन-१५/२०२४-२५/ १८५५

३० ऑगस्ट, २०२४

**परिपत्रक:**

प्रति,
सर्व, उच्च शिक्षण विभागांतर्गत अनुदानित संचलित महाविद्यालये,
श्रीमती ना. दा. ठा. महिला विद्यापीठ,
चर्चगेट, जुहू व पुणे आवार.

विषय: अशासकीय अनुदानित महाविद्यालयीन प्रयोगशाळा परिचर/ग्रंथालय परिचर या पदाच्या वेतननिश्चितीबाबत...
संदर्भ : उशिसं/मवि-१/प्रयो. परिचर/ग्रंथा.परिचर/२०२४, दि. /२०२४

मा. महोदय/महोदया,

कृपया उपरोक्त परिपत्रकाचे अवलोकन करावे. मा. शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, पुणे, यांचे संदर्भीय परिपत्रक क्र. उशिसं/मवि-१/प्रयो. परिचर/ग्रंथा.परिचर/२०२४, दि. /२०२४ विद्यापीठास प्राप्त झाले असून, सदर परिपत्रकातील मागदर्शनपर सुचनांप्रमाणे, संबधित पदनामांवरील कार्यरत/सेवानिवृत्त कर्मचा-यांच्या वेतननिश्चितीबाबत आपल्या स्तरावरून कार्यवाही करावी.

(डॉ. विलास द. नांदवडेकर)
कुलसचिव

सोबत: शिक्षण संचालनालयाचे परिपत्रक

प्रत: श्री निलेश कासळे, तांत्रिक सहायक, जुहू, (आस्थापना विभागांतर्गत वेबसाईटवर प्रसिध्द् करणेसाठी)

D:\Ghadge 14-15\Circular New

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)
४१२ ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर ४११०१६.
Web : www.dhepune.gov.in
E-Mail : mavi.dhepune@gov.in
दूर ध्वनी.०२०/२६१२२११९/२६०५१५१२,२६१३०६२७,२६१२४६३९
फॅक्स नं.०२०/२६१११११५३

क्र.: उशिसं/मवि-१/प्रयो. परिचर/ग्रंथा. परिचर/२०२४ दिनांक- /२०२४

## परिपत्रक

**विषय: अशासकीय अनुदानित महाविद्यालयीन प्रयोगशाळा परिचर / ग्रंथालय परिचर या पदाच्या वेतननिश्चीतीबाबत..**

वाचा:१. शालेय शिक्षण व रोजगार विभागाची अधिसूचना दि. २९.०१.१९९०
२. उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा शासन निर्णय क्र.:एनजीसी १७९७/ १८०९१/(२९७६)/विशि-४ दि. ८.१०.१९९७
३. उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा शासन निर्णय क्र.: संकीर्ण २००१/ (१४७/०१)/विशि-४ दि. २३.८.२००४
४. उच्च व तंत्र शिक्षण विभागाची अधिसूचना दि. ७.१०.२००९

उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या शासन निर्णय दि. ७ नोव्हेंबर २००६ नुसार पुर्वीची कालबध्द पदोन्नती योजना बंद करुन नवीन सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना सुरु करण्यात आली. सदर योजना रु. ८०००-१३५०० व त्याहून कमी वेतन घेणा-या अधिकारी / कर्मचा-यांना लागू करण्यात आली. सदर योजना अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील कर्मचा-यांना दि. १/१०/२००६ पासून लागू करण्यात आली.

अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील प्रयोगशाळा परिचर व ग्रंथालय परिचर या पदांना अनुक्रमे १२ व २४ वर्षांच्या सेवेनंतर कालबध्द /आश्वासित प्रगती योजनेचा लाभ अनुज्ञेय करीत असताना विभागीय सहसंचालक कार्यालयांच्या (उच्च शिक्षण) स्तरावर वेगवेगळया ग्रेड पे /वेतनश्रेणी मध्ये वेतननिश्चिती करण्यात येत असल्याची बाब संचालनालयाच्या निदर्शनास आलेली आहे. त्याअनुषंगाने प्रयोगशाळा परिचर / ग्रंथालय परिचर यांच्या वेतननिश्चिती विषयक कार्यवाहीचा सर्वंकष विचार करण्यासाठी संचालनालयाच्या स्तरावरुन सहायक संचालक (लेखा), प्रस्तूत संचालनालय यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने दि. ५.६.२०२४ रोजी संचालनालयास अहवाल सादर केलेला आहे. सदर अहवालाच्या अनुषंगाने प्रयोगशाळा परिचर/ ग्रंथालय परिचर या पदांच्या वेतननिश्चिती संदर्भात पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत. -

शासन अधिसूचना शालेय शिक्षण व रोजगार विभाग, मंत्रालय, मुंबई दि. २९ जानेवारी, १९९० अन्वये ग्रंथालय/प्रयोगशाळा परिचर यांना ९५०-१४०० ही वेतनश्रेणी अनुज्ञेय केली आहे. उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा शासन निर्णय क्र.: एनजीसी १७९७/१८०९१/(२९७६)/ विशि-४ दि. ८.१०.१९९७ अन्वये अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालये यातील वर्ग ३ व ४ च्या

कर्मचा-यांना कालबध्द पदोन्नती योजना लागू केली असून यामधील परिशिष्ठ - १ नुसार ९५०-२०-११५०- दरो- २५-१४०० या वेतनश्रेणीत वेतन घेणा-या ग्रंथालय परिचर / प्रयोगशाळा परिचर या एकाकी पदांना १२ वर्षानंतर १२००-३०-१४४०-दरो- ३०-१८०० ही वेतनश्रेणी लागू केली आहे.

उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा शासन निर्णय क्र.: संकीर्ण २००१/ (१४७/०१)/विशि-४ दि. २३.८.२००४ मधील मुद्दा क्र. १ नूसार **ज्या पदांना पदोन्नती साखळीत पद उपलब्ध नाही अशा एकाकी पदांवरील कर्मचा-यांना** दि. ८.१०.१९९७ च्या शासन निर्णयाप्रमाणे पदोन्नतीची वेतनश्रेणी मंजूर करण्यात आलेली आहे त्यांना दि. १ जानेवारी १९९६ पासून या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ठ - १ मध्ये नमुद केल्यानूसार खालीलप्रमाणे समकक्ष सुधारीत वेतनश्रेणी अनुज्ञेय राहील.

| विद्यमान वेतनश्रेणी | सुधारीत वेतनश्रेणी |
|---|---|
| १२००-३०-१४४० दरो ३०-१८०० | ४०००-१००-६००० |

यापुढे सहाव्या वेतन आयोगातील वेतननिश्चिती करतेवेळी उच्च व तंत्र शिक्षण विभागाची अधिसूचना दि. ७ ऑक्टोंबर २००९ मधील नियम १५ (३) नुसार दि. १ जानेवारी २००६ पूर्वी कालबध्द पदोन्नती अथवा आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळालेल्या व **पदोन्नतीची संधी उपलब्ध नसलेल्या कर्मचा-यांना या योजनेचा लाभ मिळण्यापूर्वीच्या विद्यमान वेतनश्रेणीस अनुज्ञेय वेतनबँड व ग्रेडवेतन अनुज्ञेय करण्यात येईल.** त्यांची वेतननिश्चिती नियम ७ किंवा ११ प्रमाणे करण्यात यावी, असे स्पष्ट करण्यात आले आहे. त्यानूसार वेतननिश्चिती करणे आवश्यक आहे.

शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग दि. २८ डिसेंबर, २०१० व वित्त विभाग शासन निर्णय दि. ५ जुलै, २०१० नूसार सदर कर्मचा-यांना अतिरीक्त ग्रेड वेतन खालीलप्रमाणे अनुज्ञेय राहील.

| अ.क्र. | पदाचे ग्रेड वेतन | पहिल्या लाभानंतरचे ग्रेड वेतन | दूस-या लाभानंतरचे ग्रेड वेतन |
|---|---|---|---|
| १. | २००० पर्यंत | २०० | ३०० |
| २. | २००१-४००० | ३०० | ४५० |
| ३. | ४००१- ५००० | ४०० | ६०० |
| ४. | ५००१- ५९०० | ५०० | ७०० |

उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा शासन निर्णय क्र.: संकीर्ण २०१०/(४८८/१०)/विशि-१ दि. २८ डिसेंबर २०१० अन्वये अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील कर्मचा-यांच्या ज्या पदांस पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नाहीत, जी पदे एकाकी आहेत अशा कर्मचा-यांना पूर्वीची सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना बंद करुन नविन दोन लाभाची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना दि. १/१०/२००६ पासून लागू करण्यात आली आहे. ही योजना पीबी-३ रु. १५६००-३९१००+५४०० पर्यंत ग्रेड वेतन घेणा-या एकाकी पदावरील कर्मचा-यांना लागू राहील. या योजनेंतर्गत जास्तीत जास्त दोन लाभ मंजूर करण्यात येतील. यापूर्वी कालबध्द पदोन्नती अथवा सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेंतर्गत लाभ मिळाला असल्यास तो प्रथम लाभ समजण्यात

येईल. पहिल्या लाभानंतर १२ वर्षाची नियमित सेवा पूर्ण केल्यानंतर दूसरा लाभ मंजूर करण्यात येईल.

उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा शासन निर्णय दि. २८/१२/२०१० नुसार प्रयोगशाळा परिचर/ ग्रंथालय परिचर या एकाकी पदांवरील कर्मचा-यांना खालीलप्रमाणे लाभ (वेतनश्रेणी) मंजूर होतील.

| पदनाम | शैक्षणिक अर्हता | चौथा वेतन आयोग | पाचवा वेतन आयोग | सहावा वेतन आयोग | सातवा वेतन आयोग |
|---|---|---|---|---|---|
| प्रयोगशाळा परिचर/ ग्रंथालय परिचर | दि. ३१/१२/१९८५ पूर्वी सेवेत असल्यास / (दि. २९.१.१९९० रोजी) ३० वर्षे पूर्ण झाली असल्यास / प्री एसएससी भौतीकशास्त्र व रसायनशास्त्र विषयासह उत्तीर्ण असल्यास / शालांत परीक्षा विज्ञान विषय घेऊन अनुत्तीर्ण असल्यास | 950-1400 | 3050-4590 | 5200-20200 G.P. **1900** | **S-6** |
| १२ वर्ष पहिला लाभ | | 1200-1800 | 4000-6000 (1978 पुर्वी) 3200-4900 (1978 नंतर) | 5200-20200 G.P. **2100** | **S-7** |
| २४ वर्ष दूसरा लाभ | | -- | -- | 5200-20200 G.P. **2550** | **S-8** |
| प्रयोगशाळा परिचर/ ग्रंथालय परिचर | वरील अर्हता नसल्यास / शालांत परिक्षा विज्ञान विषया व्यतिरीक्त इतर विषय घेऊन अनुत्तीर्ण असल्यास | 750-940 | 2550-3200 | 4440-7440+ G.P. 1300 | S-1 15000-47600 |
| १२ वर्ष पहिला लाभ | | 775-1150 | 2610-4000 | 4440-7440 G.P. 1500 | S-3 16600-52400 |
| २४ वर्ष दूसरा लाभ | | - | - | 4440-7440 G.P. 1800 | S-5 18000-56900 |

प्रयोगशाळा परिचर/ग्रंथालय परिचर या पदांना कालबध्द पदोन्नती/ आश्वासित प्रगती योजने अंतर्गत लाभ देताना वेतननिश्चितीची कार्यवाही उपरोक्तप्रमाणे करण्यात यावी.

Signed by
Shailendra Kamlakar Deolankar
Date: 16-08-2024 15:19:58

**(डॉ. शैलेन्द्र देवळाणकर)**
प्र.शिक्षण संचालक(उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे -१६.

प्रती -

१. सर्व विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य.

२. सर्व लेखाधिकारी, लेखा व अनुदाने, उच्च शिक्षण.